दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ✿ बुधवार, दि. ०२ सप्टेंबर २०२६ ✿ वर्ष : १ ✿ अंक : १३३ ✿ पाने : ४ ✿ किंमत : ४ रू. ✿ Email : hinduprakashvarta@gmail.com ✿ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

## अर्थसंकल्पातील मंजूर निधी ओबीसी मंत्रालयाला द्या

मुंबई : ओबीसींसाठी अर्थसंकल्पातील मंजूर निधी वित्त विभागाने ओबीसी विभागाला तातडीने द्यावा, अशी तंबी ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना दिली. ते म्हणाले, हा निधी द्यावा असे कायदेशीर बंधन असतानाही अधिकाऱ्यांनी वेळकाढूपणा केला आहे. मंत्री छगन भुजबळ, गुलाबराव पाटील, संजय राठोड यांनी निधी विलंबावर खंत व्यक्त केल्याने, बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला.

## 'बाळासाहेबांचे विचार गोठवले, आता धनुष्यबाण गोठवणार?'

**नवी दिल्ली :** शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मंगळवारी नवी दिल्लीत दाखल झाले. यावेळी त्यांनी उबाठा गटावर जोरदार टीका केली. "बाळासाहेब ठाकरे यांना धनुष्यबाण प्राणाहून प्रिय होता. २०१९ मध्ये त्यांच्या विचारांना, हिंदुत्वाला, जनतेच्या बहुमताला आणि पक्षाच्या घटनेला गोठवण्याचे काम झाले. आता धनुष्यबाण गोठवण्याची मागणी केली जात आहे," असा आरोप शिंदे यांनी केला.

## थोडक्यात वार्ता

### आता एका क्लिकवर मिळणार जमीन सर्च रिपोर्ट!

**मुंबई :** राज्यातील जमीन व्यवहार अधिक पारदर्शक आणि सुलभ करण्यासाठी महसूल व वन विभागाने 'महाभूमी स्टॅक' ही एकात्मिक डिजिटल प्रणाली सुरू केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला. या माध्यमातून जमिनीच्या मालकीहक्कापासून व्यवहार आणि न्यायालयीन प्रकरणांपर्यंतची माहिती एका क्लिकवर मिळणार आहे.सध्या महाभूलेख, महाभूनकाशा आणि IDRS यांसारख्या वेगवेगळ्या प्रणालींवर उपलब्ध असलेली माहिती आता एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर मिळणार आहे. ग्रामीण भागात गट क्रमांक, तर शहरी भागात CTS/सिटी सर्व्हे क्रमांक टाकून संबंधित भूखंडाची माहिती शोधता येईल. या प्रणालीमध्ये ३.५ कोटींहून अधिक ७/१२ आणि ८-अ अभिलेख, १.५ कोटींहून अधिक भू-नकाशे आणि मिळकत पत्रिका तसेच ४० कोटींहून अधिक जुने फेरफार व अभिलेख उपलब्ध आहेत. जमीन खरेदीपूर्वी नागरिकांना संबंधित भूखंडाचा सध्याचा वापरकर्ता, बोजे, मागील फेरफार, नोंदणीकृत व्यवहार आणि न्यायालयीन प्रकरणांची स्थिती तपासता येणार आहे. त्यामुळे फसवणुकीला आळा बसण्यासोबतच मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होणार आहे. ७/१२, ८-अ, नकाशा, फेरफार स्थिती, मोजणी अर्ज आणि दस्त शोध यांसारख्या विविध सेवाही एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने नागरिकांचा वेळ, श्रम आणि खर्च वाचणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाभूमी स्टॅकमुळे गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. भविष्यात या प्रणालीमध्ये GIS, AI आधारित शोध सुविधा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रणालींचे एकात्मीकरण करण्याचे नियोजन आहे.

### ऑगस्टमध्ये जीएसटी महसूल 14.8 टक्क्यांनी वाढून सुमारे दोन लाख कोटींवर पोहोचला

**नवी दिल्ली :** देशाचे जीएसटी महसूल संकलन ऑगस्टमध्ये वार्षिक आधारावर 14.8 टक्क्यांनी वाढून सुमारे 2 लाख कोटी रुपये झाले आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये एकूण जीएसटी महसूल संकलन 1.74 लाख कोटी रुपये झाले होते. जीएसटी महासंचालनालयाने मंगळवारी जारी केलेल्या आकडेवारीनुसार, एकूण माल आणि सेवा कर (जीएसटी) महसूल संकलन ऑगस्टमध्ये वार्षिक आधारावर 14.8 टक्क्यांनी वाढून 1,99,853 कोटी रुपये (सुमारे दोन लाख कोटी रुपये) झाले आहे. या कालावधीत निव्वळ जीएसटी महसूल संकलन 1.68 लाख कोटी रुपये राहिले आहे, जे वार्षिक आधारावर 8.3 टक्क्यांची वाढ आहे. आकडेवारीनुसार, देशांतर्गत व्यवहारांमधून जीएसटी महसूल 9.3 टक्क्यांनी वाढून 1.37 लाख कोटी रुपयांहून अधिक झाला आहे. आयातीतून मिळणारा महसूल 29 टक्क्यांच्या वाढीसह 62,604 कोटी रुपयांवर पोहोचला आहे. त्याचप्रमाणे सकल केंद्रीय जीएसटी संकलन ऑगस्टमध्ये 38,413 कोटी रुपये राहिले, राज्य जीएसटी संकलन 46,316 कोटी रुपये आणि एकात्मिक जीएसटी संकलन 1.15 लाख कोटी रुपयांहून अधिक राहिले आहे.

### साखरेच्या साठेबाजीला आळा; स्टॉक लिमिट 2 हजार क्विंटलवर

नवी दिल्ली : केंद्र सरकारने साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी आणि सणांपूर्वी किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी साखर डीलर्ससाठी स्टॉक लिमिट कमी करण्याची घोषणा केली आहे. सरकारने १५ सप्टेंबरपासून साखर डीलर्ससाठी साखरेचा स्टॉक ठेवण्याची मर्यादा घटवून २ हजार क्विंटल केली आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने केंद्र सरकारने देशांतर्गत बाजारात साखरेची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आणि साखरेची साठेबाजी व सट्टेबाजी रोखण्यासाठी साखर डीलर्ससाठी स्टॉक ठेवण्याची निश्चित मर्यादा ४ हजार क्विंटलवरून आता २ हजार क्विंटल केली आहे.

## "शाल जोडे"




# प्रतिबंधित प्लॅस्टिकविरोधात मनपाची धडक कारवाई; राजेश्वरी प्लॅस्टिकवर छापा

## 3250 किलो प्लॅस्टिक जप्त; 25 हजारांचा दंड, 10 लाखांहून अधिक कॅरीबॅग वापरापासून रोखल्या

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात प्रतिबंधित प्लॅस्टिकचा वापर, साठवणूक आणि विक्रीविरोधात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली आहे. या मोहिमेंतर्गत पानदरीबा येथील राजेश्वरी प्लॅस्टिक या प्रतिष्ठानावर धडक कारवाई करून ३२५० किलोपेक्षा अधिक प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त करण्यात आले. या प्लॅस्टिकची अंदाजे किंमत ६ लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याची माहिती मनपाने दिली. संबंधित प्रतिष्ठानावर २५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला.

कारवाईदरम्यान प्रतिष्ठानात मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक कॅरीबॅगचा साठा आढळून आला. यामध्ये १० लाखांपेक्षा अधिक प्लॅस्टिक कॅरीबॅग जप्त करण्यात आल्या. जप्त केलेल्या प्लॅस्टिकची नियमानुसार शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली असून, प्रतिबंधित प्लॅस्टिक पुढील प्रक्रियेसाठी पाठविण्यात आले आहे.

ही कारवाई मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशाने आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्वच्छता अधिकारी अनिल जाधव, स्वच्छता निरीक्षक पंडित



दाभाडे, नागरिक मित्र पथकाचे देविदास सुसर, बालाजी साबळे, सुवर्णसिंग परदेशी, जनार्दन सांगळे, संतोष बनकर, ज्ञानेश्वर पाटील, किशन निकम, जयेश मगरे तसेच स्वच्छता जवान दीपक पडुळ, सुभाष दाभाडे, बाबू जाधव आणि किशोर मगरे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून शहरात विविध ठिकाणी सुरू असलेल्या कारवायांमध्ये आतापर्यंत ३७ टनांपेक्षा अधिक प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त करण्यात आले आहे. जप्त केलेल्या प्लॅस्टिकची नियमानुसार शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येत आहे. प्रतिबंधित प्लॅस्टिकचा वापर, साठवणूक, विक्री अथवा वितरण करणाऱ्यांविरोधात यापुढेही कठोर कारवाई केली जाणार असल्याचे मनपाने स्पष्ट केले आहे.

**दंडासोबत गुन्हाही दाखल करणार :** येडगे

मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी सांगितले की, शहर प्रतिबंधित प्लॅस्टिकमुक्त करण्यासाठी धडक मोहीम सुरू आहे. प्रतिबंधित प्लॅस्टिकचा साठा किंवा विक्री आढळून आल्यास केवळ दंडात्मक कारवाई न करता नियमानुसार गुन्हाही दाखल करण्यात येणार आहे. प्रतिबंधित प्लॅस्टिकला कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

महापौर समीर राजूरकर यांनी नागरिकांना प्लॅस्टिक कॅरीबॅगचा वापर टाळण्याचे आवाहन केले. दैनंदिन खरेदीसाठी नागरिकांनी कापडी, कागदी अथवा इतर पर्यावरणपूरक पिशव्यांचा वापर करावा. यामुळे पर्यावरणाचे रक्षण होण्यासोबतच शहर स्वच्छ ठेवण्यास मोठा हातभार लागेल. नागरिकांनी महानगरपालिकेच्या प्रतिबंधित प्लॅस्टिकविरोधी मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तातडीने लागू करण्याच्या मागणीसाठी जिंतूरमध्ये हजारोंचा जनआक्रोश मोर्चा

**जिंतूर, दि. १ सप्टेंबर (प्रतिनिधी) :** अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तातडीने लागू करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी मातंग समाजाच्या वतीने मंगळवारी जिंतूर येथे हजारोंच्या संख्येने जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. शहरातील प्रमुख मार्गांवरून निघालेला हा मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. यावेळी समाजबांधवांनी शासनाकडे आपल्या मागण्या ठामपणे मांडल्या.

मोर्चानंतर आयोजित सभेत विविध मान्यवरांनी उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर आपली भूमिका मांडत शासनाने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉम्रेड गणपत भिसे होते, तर उद्घाटक म्हणून राधाजी शेळके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून राजेश घोडे व दिशा खिल्लारे यांची उपस्थिती होती.



यावेळी व्यासपीठावर राजू कसबे, भीमराव हजारे, नितीन रोकडे, उफाडे सर, गनहिरे सर, खरात सर, रघुनाथ कसबे, संदीप दातरे, मारुती साठे, किशोर गवारे, विठ्ठल नाटकर, एल. डी. कदम, किशोर कांबळे, बाळासाहेब राजूरकर, सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

मोर्चा व सभा यशस्वी करण्यासाठी रमेश उर्फ गुज्जर मोहिते, रावण मोहिते, आठवले मामा, महादू काका मोहिते, ॲड. अनिल नेटके, ॲड. रमेश जोगदंड, श्रीकांत मोहिते, संतोष अंभोरे, बाळासाहेब सुतार, कैलास मोहिते, नितीन वाणी, दशरथ मोहिते, सुरेश मोहिते, गुलाब नेटके आदींनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील कलवले यांनी केले. मोर्चा व सभेला मातंग समाजातील महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपवर्गीकरणाच्या मागणीला जोरदार पाठिंबा दर्शविला.

# उपोषण सोडणार नाही, मुंबईत जाणारच; मनोज जरांगे

**जालना :** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवाली सराटीतील बेमुदत उपोषणाचा आजचा (दि. ३१ ऑगस्ट) तिसरा दिवस आहे. आम्ही सरकारपुढे ठेवलेल्या मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण सोडणार नाही, मुंबईत जाणारच, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यांचे २९ ऑगस्टपासून उपोषण सुरु आहे.



५८ लाख नोंदीच्या आधारावर सर्वांना कुणबी प्रमाणपत्र मिळावीत तसेच जात पडताळणी दरम्यान नाकारलेली प्रमाणपत्रे द्यावीत, या प्रमुख मागण्यांसाठी त्यांचे पुन्हा एकदा उपोषण सुरु आहे. त्यासाठी त्यांनी राज्य सरकारला १२ सप्टेंबरपर्यंतचा अल्टिमेटम दिला आहे.

"आम्ही मुंबईला जाण्याची तयारी करत आहोत. सरकारकडून कोणीही संपर्क साधलेला नाही. आजपासून दोन- चार दिवस अगोदरच १२ सप्टेंबरपर्यंत मुंबईत जावे. पोलिसांना कोणताही त्रास द्यायचा नाही. मराठा मुंबईत आल्याचे कुणाला समजायला नको. फक्त आझाद मैदानावर जाऊ नका. पोलिसांनी ठाण्यात नेलं तर घाबरु नका", असे आवाहन त्यांनी मराठा आंदोलकांना केले आहे.

आता मागण्या मान्य होईपर्यंत माघार नाही. ५८ लाख नोंदी सापडलेल्या नाहीत. एकनाथ शिंदे यांनी मराठ्यांना फसवलं, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगावे. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, मी फसवलेले नाही, ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, असे स्पष्ट करावे. असे आव्हान जरांगेंनी सरकारला दिले आहे.

जरांगे पाटलांच्या आंदोलनाला अभिजीत दिपकेंचा

# परभणी जिल्ह्यात 15 सप्टेंबरपर्यंत जमावबंदी; शस्त्रे व आक्षेपार्ह वस्तू बाळगण्यास मनाई

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी, दि. १(जिमाका) :** श्रीकृष्ण जन्माष्टमी, दहीहंडी, पोळा तसेच गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

या आदेशानुसार १ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजेपासून ते १५ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत परभणी जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमी दि. ४ सप्टेंबर, दहीहंडी दि. ५ सप्टेंबर, पोळा दि. १० सप्टेंबर तसेच दि. १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान गणेशोत्सव साजरा होणार आहे. या कालावधीत जिल्ह्यात अचानक आंदोलने, राजकीय पक्ष व संघटनांकडून मोर्चे, धरणे आदी कार्यक्रम होण्याची शक्यता लक्षात घेऊन हा आदेश लागू करण्यात आला आहे.

या बाबींवर निर्बंध आदेशाच्या कालावधीत सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्यावर पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र जमणे, शस्त्रे, बंदुका, तलवारी, दंडुके, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा वस्तू जवळ बाळगणे, ज्वलनशील पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ बाळगणे किंवा जमा करणे, व्यक्ती अथवा मृतदेहाची प्रतिमा किंवा पुतळा प्रदर्शित करणे यास मनाई करण्यात आली आहे.

तसेच सार्वजनिक ठिकाणी आक्षेपार्ह भाषणे, अंगविक्षेप, चित्रे, चिन्हे, फलक किंवा इतर वस्तू तयार करून त्यांचे प्रदर्शन करणे अथवा प्रसार करणे आणि ज्यामुळे सार्वजनिक शांतता, सुरक्षितता किंवा कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण होऊ शकतो, अशी कोणतीही कृती करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वयेही

# जगप्रसिद्ध अजिंठा लेणी परिसरात MTDC च्या सोलर व्यवस्थेचा पार बोजवारा लाखो रुपये पाण्यात

## खांब आणि तुटलेले पॅनेल्स नावालाच बॅटऱ्या अन् दिवे गायब अधिकाऱ्यांच्या अनदेखी'मुळे योजना धुळीस

फर्दापूर प्रतिनिधी शेख हक्कान

फर्दापूर जगप्रसिद्ध अजिंठा लेणी परिसरात देश विदेशातून येणाऱ्या लाखो पर्यटकांच्या सुविधेसाठी आणि रात्रीच्या सुरक्षेसाठी उभारण्यात आलेल्या सोलर लाईट यंत्रणेची प्रशासकीय निष्काळजीपणामुळे अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या जबाबदार अधिकाऱ्यांच्या उघड्या डोळ्यांदेखत लाखो रुपयांचा सार्वजनिक निधी कसा धुळीस मिळतो, याचा जिवंत पुरावाच येथे पाहायला मिळत आहे

**प्रत्यक्ष पाहणीत उघडा पडला भ्रष्ट कारभाराचा सांगाडा :** फक्त खांब आणि पॅनेल नावालाच प्रत्यक्ष घटनास्थळी केवळ लोखंडी खांब आणि तुटलेल्या सोलर पॅनेल्सचा सांगाडा उभा आहे

बॅटऱ्या आणि दिवे गायब सोलर यंत्रणेचे मुख्य हृदय मानले जाणारे एलईडी दिवे आणि ऊर्जा साठवणुकीसाठी बसवलेल्या महागड्या बॅटऱ्यांचा ठावठिकाणाच नाही त्या चोरीला



गेल्या की गायब केल्या असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. अंधाराचे साम्राज्य अन् सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर दिव्यांअभावी रात्रीच्या वेळी लेणी परिसरात पूर्णपणे काळोख पसरतो त्यामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून अनुचित प्रकार घडण्याची मोठी भीती व्यक्त केली जात आहे

**अधिकारी झोपलेत का :** शासकीय निधीचा असा उघड उघड अपव्यय होत असताना MTDC प्रशासन आणि संबंधित अधिकारी मात्र पूर्णपणे डोळे झाकून बसले आहेत देखभाल दुरुस्तीचा अभाव आणि अधिकाऱ्यांची गुन्हेगारी स्वरूपाची अनास्था यामुळेच हा संपूर्ण प्रकल्प नामशेष होण्याच्या मार्गावर आहे

कठोर कारवाईची जोरदार मागणी

पर्यटनस्थळाची बदनामी करणाऱ्या आणि शासकीय पैशांची नासाडी करणाऱ्या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर तसेच संबंधित कंत्राटदारावर तत्काळ कठोर कारवाई करण्यात यावी तसेच ही सोलर यंत्रणा त्वरित दुरुस्त करून पूर्ववत सुरू करण्यात यावी अशी संतप्त मागणी फर्दापूर परिसरातील नागरिक व पर्यटकांकडून केली जात आहे

# छत्रपती संभाजीनगरमध्ये आजपासून हेल्मेटची कडक अंमलबजावणी; चालकासह मागे बसणाऱ्यालाही असणार बंधनकारक

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

शहरात रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी आणि नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी पोलिस प्रशासनाने (१ सप्टेंबर) हेल्मेट सक्तीची अत्यंत कठोर अंमलबजावणी सुरू केली आहे. या नव्या मोहिमे अंतर्गत आता केवळ दुचाकी चालवणाऱ्या चालकालाच नव्हे, तर मागे बसणाऱ्या सहप्रवाशालाही हेल्मेट घालणे सक्तीचे करण्यात आले असून नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर थेट दंडात्मक कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी शहरातील सर्व पोलिस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना आपल्या हद्दीत विना हेल्मेट चालकांवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. यापूर्वी ही कारवाई प्रामुख्याने केवळ वाहतूक शाखेकपुरती मर्यादित होती. परंतु, आता शहरातील प्रत्येक पोलिस ठाण्याचे अधिकारी आपल्या पथकासह रस्त्यावर उतरून ही मोहीम राबवणार आहेत. या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दररोज सकाळी ९ ते दुपारी १ आणि सायंकाळी ५ ते ७ या व्यस्त वेळेत विशेष नाकाबंदी व तपासणी मोहीम राबवली जात आहे. स्थानिक पातळीवर कर्मचाऱ्यांची कमतरता भासल्यास पोलिस मुख्यालयातून अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाणार आहे, ज्यामुळे प्रमुख रस्त्यांसह अंतर्गत गल्लीबोळातही पोलिस पाळत ठेवून असणार आहेत.

राज्यातील अपघाती मृत्यूंची संख्या १० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट पोलिस महासंचालक कार्यालयाने ठेवले आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात चालू वर्षातील जानेवारी ते मे या पहिल्या पाच महिन्यांतच रस्ते अपघातांत तब्बल २४४ नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. या अत्यंत चिंताजनक आकडेवारीची गंभीर दखल घेत प्रशासनाने हे कठोर पाऊल उचलले आहे. ऑगस्ट महिन्यात वाहतूक शाखेने शासकीय कार्यालये, पोलिस कर्मचारी आणि सामान्य नागरिकांवर विना हेल्मेट कारवाई करत तब्बल ५ हजार ६०० दंड आकारले होते. तसेच, काही दिवसांपूर्वी अवघ्या चार तासांत १ हजार १३० विना हेल्मेट चालकांवर कारवाई करण्यात आली होती, जी वाढत्या कारवाईची तीव्रता दर्शवते.

हेल्मेट हा नियम केवळ पोलिसांच्या दंडात्मक कारवाईपासून वाचण्यासाठी नसून स्वतःच्या आणि कुटुंबाच्या सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक आहे, असे आवाहन पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी नागरिकांना केले आहे. अपघात कधीही सांगून येत नाही आणि डोक्याला होणारी गंभीर दुखापत टाळण्यासाठी हेल्मेट हे जीवनरक्षक कवच ठरते, त्यामुळे चालकासोबतच मागे बसणाऱ्या व्यक्तीनेही आपली जबाबदारी समजून हेल्मेटचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# भराडीत रंगले नववे राज्यस्तरीय 'फकीरा' ग्रामीण कविसंमेलन

हिंदू प्रकाशवार्ता वृत्तसेवा

**सिल्लोड:** मुलगी म्हणजे सावित्री जिजाई, रमाईच रुप आहे , कोण म्हणत ती शाप आहे

मोठ्या गर्वाने म्हणा, मी जन्मदात्या मुलीचा बाप आहे . देविदास तुपे यांनी कवितेतून स्त्री - भृण हत्येवर प्रहार केला तर "राहीला ना मोह मला कशाचा, मी देवही वाटूनी मोकळा जाहलो राणा दौड यांनी गजल सादर करत जीवनाचे तत्वज्ञान सांगितले तर दुष्काळी परिस्थितीत बापाने आत्महत्या केली पॅकेज मिळेल पण मला बाप मिळेल का ? या सोमनाथ सारोळेकर यांच्या कवितेते उपस्थितांचे डोळे पाणावले. निमित्त होते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व शिक्षणमहर्षी हिम्मतराव गरुड यांचे पुण्यस्मरण या निमिताने ज्ञानविकास विद्यालय भराडी येथे नववे राज्यस्तरीय 'फकीरा' ग्रामीण कविसंमेलन रंगले . यात कवींनी एकापेक्षा एक सरस कविता सादर करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले .



या राज्यस्तरीय कविसंमेलनाचे उद्घाटन केंद्रप्रमुख सुनिता उबाळे यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी सुनील डोके , तर पाहुणे म्हणून पहिल्या शिक्षक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष हबीब भंडारे, गणेश राव उपस्थित होते. कार्यक्रमात सातत्याने शैक्षणिक विषयांवर लेखन करणारे शिक्षक शिवाजी काकडे यांना शैक्षणिक विचारप्रबोधन व लेखनसेवा या पुरस्काराने सन्मानित तर सेहगल फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक अमोल भिलंगे यांना सामाजिक कार्याबददल सन्मानित करण्यात आले .

कार्यकमात सुनिल उबाळे, राणा दौड, बद्रीनाथ भालगडे,सुरेश कायटे, पंडीत वराडे, संजय पवार, राजेंद्र सपकाळ, गीतांजली गजबे फरकाडे बाबा, गोपाळ इंगळे, सागर कोलते, सत्यभामा पुरी, लक्ष्मण वाल्डे, दत्ता अण्णा मोरस्कर,सुनिता कपाळे, वंदना पाटील,प्रतिभा आघारडे ,दौलत भारती, चंद्रभान भारती, सत्यभामा पुरी, श्रीराम दापके, संजय पवार,आदी निमंत्रीत कवी तर पूनम कोलते, देवयानी शेजुळ, श्रद्धा शेजुळ, राज कोलते, अनुष्का थोरात आदी विद्यार्थी सहभागी झाले होते . संमेलनात कवींनी आई - वडीलांचे प्रेम, स्त्री भृण हत्या, शेतकरी, निसर्ग, अशा शैक्षणिक, सामाजिक , निसर्ग , पर्यावरण अशा वेगवेगळ्या विषयांवर एकापेक्षा एक सरस कविता , गजल सादर केल्यामुळे प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले होते.सूत्रसंचालन सोमनाथ सारोळेकर यांनी केले . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नानासाहेब गायकवाड, समन्वयक देविदास तुपे, आदीसह शिक्षकांनी परीश्रम घेतले . उपस्थितांचे स्वागत व आभार संस्थेचे अध्यक्ष तथा माजी सभापती अशोक गरुड यांनी मानले .

# नवनिर्वाचित तहसीलदार सागर वाघमारे यांचा सत्कार



**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तहसील कार्यालयात नवनिर्वाचित तहसीलदार सागर वाघमारे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचा पंचायत समिती सदस्य शेख सलीम शेख भिकन यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

नवनिर्वाचित तहसीलदार सागर वाघमारे यांचे उपस्थितांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी शेख सलीम यांनी तहसीलदार वाघमारे यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. महसूल विभाग हा सर्वसामान्य नागरिकांशी थेट संबंधित असल्याने नागरिकांच्या विविध समस्या, महसूल विषयक प्रकरणे, शेतकऱ्यांच्या अडचणी तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

तहसीलदार सागर वाघमारे यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्या सोडविण्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक त्या उपाययोजना करण्यावर भर देण्यात येईल, असा विश्वास व्यक्त केला. सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयात कामासाठी येताना अडचणी निर्माण होऊ नयेत आणि त्यांना वेळेत सेवा मिळावी, यासाठी प्रयत्न करण्याची अपेक्षा यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

या सत्कार प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी तहसीलदार वाघमारे यांचे अभिनंदन करून त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास सामाजिक व राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी, नागरिक तसेच तहसील कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# वृक्षप्रेमी नितीन जाधव गोगलगावकर यांना पर्यावरण मित्र पुरस्कार 2026 सन्मानित



हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :**-एकता सेवाभावी संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने एकता संस्थेचे प्रांत कार्याध्यक्ष शासकीय गुत्तेदार माननीय श्री अरुण जी मराठी साहेब त्यांच्या 77 व्या वाढदिवसाच्या औचित्य साधून अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने पर्यावरण मित्र पुरस्कार वितरण सोहळा व कलात्मक मेहंदी सन्मानपत्र वितरण सोहळा मध्ये परभणी जिल्ह्यातील सामाजिक चळवळीत पर्यावरण पूर्वक निसर्ग पूर्वक वृक्ष लागवड संवर्धन हे मुक्त अभियान झाड खिळे मुक्त अभियान गोसंवर्धन प्राणी मित्र संवर्धन पशुपक्षी संवर्धन झाड वृक्ष पाणी जल है तो कल है स्वच्छता वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे चराचरी गोमय राखी गोमय गौरी गणपती पर्यावरण पूर्वक महाजन जागृती अभियान राबवणारे प्रचार प्रसार करणारे वृक्ष मित्र प्राणी मित्र पशु मित्र झाड सेवक गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांना 2026 च्या पर्यावरण मित्र पुरस्कार सन्मान चिन्ह मानपत्र देऊन गौरव व सन्मानित करण्यात आले आला हा कार्यक्रम सोहळा दिनांक 31 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी सहा वाजता बी रघुनाथ सभागृह एस पी ऑफीस च्या समोर वसमत रोड परभणी येथ संपन्न झाला कार्यक्रमाचे आयोजक एकता सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अजमत खान कार्यक्रमाचे संयोजक उद्योजक तुषार भाऊ मराठे आणि एकता सहभागी संस्थेची जिल्हाध्यक्ष प्राध्यापक डॉ. अरुण पडघन सर त्याच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमासाठी मुंबई सिनेअभिनेता त्यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचे अध्यक्ष एकता सेवा संस्थे महाराष्ट्राचे प्रांताध्यक्ष प्राध्यापक टी.पी मुंडे, संभाजी सेनेचे प्रदेशाध्यक्ष रामेश्वर काका शिंदे प्राध्यापक कणके सर विशेष अतिथी परभणीचे महापौर सय्यद भाई इकबाल अतिथी ज्येष्ठ विधिज्ञ अँड अशोक सोनी, मराठा समाजाचे प्रदेशाध्यक्ष सुभाष दादा जावळे पाटील प्रमुख अतिथी गजक समाजसेवक अँड पवन भाऊ निकम, आणि सत्कारमूर्ती उद्योजक अरुण जी मराठे साहेब या मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान चिन्ह मानपत्र देऊन गौरव सन्मान गौरव सत्कार करण्यात आला

# परभणीत 'भटके-विमुक्त दिवस' साजरा; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:** भटक्या-विमुक्त समाजाचा इतिहास, संघर्ष, हक्क आणि विकासाचा जागर यासाठी ३१ ऑगस्ट रोजी परभणीत 'भटके-विमुक्त दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभाग आणि सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

'भटकंतीचा इतिहास, संवादाची ओळख, सन्मान आणि विकास' या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजकल्याण सहाय्यक आयुक्त राजू एडके होते. प्रमुख व्याख्याते विजयकुमार पवार, अशासकीय सदस्य डॉ. केदार खटिंग, हनुमानसिंग कच्छवे, लक्ष्मण सोनवणे तसेच संयोजक तथा सहाय्यक संचालक रामेश्वर मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. कुमारी भक्ती रोकडे हिने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित स्फूर्तीदायी पोवाडा सादर केला.

यावेळी दहावी, बारावी, नीट व जेईई परीक्षेत तसेच निबंध, चित्रकला आणि रांगोळी स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या आश्रमशाळा व वसतिगृहातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. शासकीय सेवेत रुजू झालेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला.

प्रमुख वक्ते विजयकुमार पवार यांनी भटक्या-विमुक्त समाजाच्या इतिहासावर प्रकाश टाकला.

प्रास्ताविक अजमेर शेख यांनी केले. सूत्रसंचालन रेवणअप्पा साळेगावकर यांनी केले, तर संजय राठोड यांनी आभार मानले. लेखाधिकारी डॉ. वामन काकडे, निरीक्षक तुकाराम भराड आणि गणेश जाधव यांनी मान्यवरांचा 'महात्मा फुले व सावित्रीबाई फुले वाङ्मय खंड' व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

# 30 वर्षांवरील नागरिकांची आरोग्य तपासणी; 100 दिवसांचे विशेष अभियान

## मधुमेह, उच्च रक्तदाबासह कर्करोगाचे लवकर निदान व उपचारावर भर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत जिल्ह्यात '३० वर्षांचा पल्ला, तपासणी अन् सल्ला' हे १०० दिवसांचे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. १ सप्टेंबर ते १० डिसेंबर २०२६ या कालावधीत होणाऱ्या या अभियानात ३० वर्षे व त्यावरील महिला व पुरुषांची मधुमेह, उच्च रक्तदाब तसेच तोंडाचा, स्तनाचा आणि गर्भाशय मुखाचा कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांसाठी तपासणी करण्यात येणार आहे. आजारांचे लवकर निदान करून वेळेत उपचार व नियमित पाठपुरावा करण्याच्या माध्यमातून भविष्यातील गंभीर गुंतागुंत टाळण्याचा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

जिल्ह्यातील ३० वर्षे व त्यावरील प्रत्येक नागरिकाची आरोग्य तपासणी सुनिश्चित करण्यावर आरोग्य विभागाचा भर राहणार आहे. तपासणीदरम्यान मधुमेह व उच्च रक्तदाबाचे निदान करण्यासोबतच तोंडाचा, स्तनाचा व गर्भाशय मुखाचा कर्करोग यांची प्राथमिक तपासणी केली जाणार आहे. तपासणीमध्ये संशयित आढळणाऱ्या नागरिकांना पुढील तपासणीसाठी संदर्भित करून त्यांचे निदान, उपचार आणि नियमित पाठपुरावा केला जाणार आहे. अभियानातील लाभार्थी व तपासणीची माहिती एनपीएनसीडी पोर्टलवर अद्ययावत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अभियानाची अंमलबजावणी सात टप्प्यांत केली जाणार आहे. १ ते १५ सप्टेंबरदरम्यान आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण होईल. १६ ते २१ सप्टेंबरदरम्यान ३० वर्षांवरील लोकसंख्येची यादी, नोंदणी व पोर्टलवर माहिती भरण्यात येईल. २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान गावपातळीवर तपासणी, ३ ते १३ ऑक्टोबरदरम्यान उच्च जोखमीच्या नागरिकांची तपासणी, तर १४ ते ३० ऑक्टोबरदरम्यान आरोग्य व कल्याण केंद्र स्तरावर तपासणी करण्यात येईल. १ ते १० नोव्हेंबरदरम्यान तालुका व जिल्हास्तरावर पुढील तपासणी, तर १० नोव्हेंबर ते १० डिसेंबरदरम्यान तृतीयस्तरीय आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. निश्चित उद्दिष्ट विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी दिले आहेत. प्रत्येक टप्प्याचे योग्य नियोजन करून त्याचा अहवाल जिल्हास्तरावर सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

"वेळेत तपासणी म्हणजे भविष्यातील गुंतागुंत टाळण्याची संधी आहे. आजाराचे वेळीच निदान आणि योग्य उपचार घेतल्यास पुढील गंभीर गुंतागुंत टाळता येते. त्यामुळे ३० वर्षे व त्यावरील प्रत्येक नागरिकाने या अभियानाचा लाभ घेऊन आरोग्य तपासणी करून घ्यावी," असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी केले आहे.

# तिसगावात मोफत नेत्र तपासणी शिबिर; 153 ग्रामस्थांची तपासणी




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**तिसगाव :** एचजी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने सीएसआर उपक्रमांतर्गत तिसगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयाजवळ मोफत नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिरात १५३ ग्रामस्थांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीत दृष्टीदोष आढळलेल्या तसेच गरज असलेल्या ८७ लाभार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. आवश्यक असलेल्या नागरिकांना पुढील उपचाराबाबत मार्गदर्शनही करण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या परिसरातच प्राथमिक नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून देणे, दृष्टीदोष वेळेत ओळखणे आणि आवश्यक उपचारासाठी मार्गदर्शन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. विशेषतः वयोवृद्ध नागरिकांनी शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. शिबिराच्या आयोजनासाठी तिसगावचे सरपंच, उपसरपंच, आशा कर्मचारी आणि आरोग्य सेविकांचे सहकार्य लाभले. ग्रामपंचायत व स्थानिक आरोग्य यंत्रणेच्या सहकार्यामुळे शिबिराचे नियोजन सुरळीतपणे पार पडले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीचे मॅनेजर हरीश लालकोट, प्रोग्राम कोऑर्डिनेटर सचिन लिमकर, इरशाद सय्यद, मेरा सय्यद तसेच सारिका गवळी यांनी विशेष परिश्रम घेतले. एचजी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या गरजा लक्षात घेऊन विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी दोन्ही संस्थांचे आभार व्यक्त केले.

# पोलीस स्टेशन सोयगाव आयोजित वाहतूक सुरक्षा या विषयावर आयोजित चित्रकला स्पर्धा संपन्न



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१ सप्टेंबर :** पोलीस स्टेशन सोयगाव आयोजित वाहतूक सुरक्षा या विषयावर आयोजित चित्रकला स्पर्धा पार पडली यासाठी कला शिक्षक विद्याधर बागुल यांनी मार्गदर्शन केले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड सह सर्व शिक्षक यांनी सहकार्य लाभले.विजेते स्पर्धक यांचे अभिनंदन

बक्षीस व प्रमाणपत्र सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे तर्फे देण्यात येणार आहे.

या उपक्रम साठी शिक्षण प्रेमी अरुण सोहनी व कला निदेशक विवेक महाजन व शिवराम आगे यांचे अनमोल सहकार्य लाभले आहे. सुलभक म्हणून भास्कर चौधरी यांनी कार्य पार पाडले.

# SIR कार्यक्रमाअंतर्गत मतदारांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध; नाव नोंदणी, दुरुस्ती व हरकती नोंदविण्याचे आवाहन

**मादणी, ता. सिल्लोड :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत मादणी येथील यादी भाग क्र. 178 आणि 179 मधील मतदारांची प्रारूप मतदार यादी BLO श्री. अजय जेऊघाले आणि श्री. रमाकांत जाधव यांच्या मार्फत प्रसिद्ध करण्यात आली आहे. मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व त्रुटीमुक्त करण्याच्या उद्देशाने हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे.




या प्रारूप मतदार यादीमध्ये आपले नाव आहे किंवा नाही, तसेच मतदार यादीतील नाव, पत्ता, वय, छायाचित्र अथवा इतर तपशीलांमध्ये काही त्रुटी असल्यास संबंधित मतदारांनी याची पडताळणी करून घ्यावी. पात्र मतदारांचे नाव यादीत समाविष्ट नसल्यास नाव नोंदणीसाठी, तसेच चुकीच्या नोंदींबाबत दुरुस्ती अथवा हरकत नोंदविण्यासाठी निर्धारित कालावधीत अर्ज करता येणार आहे. मतदारांनी आपल्या मतदान केंद्राशी संबंधित BLO (बूथ लेव्हल अधिकारी) यांच्याशी संपर्क साधून प्रारूप मतदार यादीची पाहणी करावी. पात्र नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करून घेणे आवश्यक आहे. कोणताही पात्र नागरिक मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये, यासाठी नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

SIR कार्यक्रमाच्या माध्यमातून मतदार यादीतील दुबार, स्थलांतरित किंवा अपात्र नोंदींची पडताळणी करून पात्र मतदारांची अचूक नोंद सुनिश्चित करण्यावर भर देण्यात येत आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीच्या आधारेच आवश्यक कार्यवाही करावी, असे आवाहन निवडणूक प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी ग्रामसेवक शशिकांत निंबाळकर, दिनेश कालभिले, दादाराव अपार, विष्णू अपार, देविदास खराटे, दादाराव काळे, विजय कालभिले, शकील अहमद, जयेश लाड आदी मान्यवर उपस्थित होते.

## गणेशोत्सव देखावा स्पर्धेत यंदा गड-किल्ल्यांचा समावेश

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने यंदाही सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, यंदापासून ऐतिहासिक देखाव्यांमध्ये गड-किल्ल्यांचा समावेश करण्यात आला आहे. समाजप्रबोधन, ऐतिहासिक, धार्मिक-आध्यात्मिक तसेच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित जीवंत देखाव्यांना प्रत्येकी प्रथम २५ हजार, द्वितीय १५ हजार व तृतीय १० हजार रुपयांची पारितोषिके दिली जाणार आहेत.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधन, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जतन करावे, असे आवाहन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले. तसेच विसर्जन मिरवणुकीतील पारितोषिकांच्या रकमेत वाढ करण्यात आली असून प्रथम २५ हजार, द्वितीय १५ हजार आणि तृतीय १० हजार रुपये देण्यात येणार आहेत.

# विद्यार्थ्यांनी ज्ञान, संस्कार व सामाजिक बांधिलकीची मूल्ये जपून उज्ज्वल भविष्य घडवावे - मान्यवरांचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१ सप्टेंबर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरशी संलग्नित व अजिंठा शिक्षण संस्थेचे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या दीक्षांत समारंभाचे मंगळवार,दि.१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता उत्साहपूर्ण व मंगलमय वातावरणात आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून आणि डॉ.लेखचंद मेश्राम आणि प्रा.शिवाजी सिरसाठ उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,तसेच क्रीडा विभाग प्रमुख डॉ.निलेश गाडेकर, पदव्युत्तर समन्वयक डॉ.छत्रगुन भोरे,डॉ.रामेश्वर मगर, कार्यालयीन अधीक्षक पंकज साबळे,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.सुनील चौधरे यांची प्रमुख उपस्थिती होती.दीक्षांत समारंभ हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील अत्यंत महत्त्वाचा आणि अभिमानाचा क्षण असतो. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून पुढील वाटचालीस सज्ज होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या समारंभाचे आयोजन करण्यात आले.शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञान संपादन न होता चारित्र्य,शिस्त, सामाजिक जाणीव,नेतृत्वगुण आणि जबाबदारीची भावना



विकसित होणे आवश्यक असल्याचे यावेळी मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून अधोरेखित केले.

प्रमुख अतिथी डॉ.लेखचंद मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना शिक्षणाचा उपयोग स्वतःच्या प्रगतीबरोबरच समाजाच्या विकासासाठी करण्याचे आवाहन केले. बदलत्या काळातील आव्हानांचा सामना करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या विषयातील ज्ञानासोबतच कौशल्ये, तंत्रज्ञानाची जाण आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित करावा,असे त्यांनी सांगितले.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या माध्यमातून विविध क्षेत्रांमध्ये संधी उपलब्ध करून देण्यासाठी अजिंठा शिक्षण संस्था सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातून प्राप्त केलेले ज्ञान आणि संस्कार आयुष्यभर जपावेत.यश मिळविताना प्रामाणिकपणा,कर्तव्यनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी यांना सर्वोच्च स्थान द्यावे,असे त्यांनी सांगितले.

यावेळी उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या भावी शैक्षणिक, व्यावसायिक व सामाजिक जीवनासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.दीक्षांत समारंभ हा शिक्षणाचा शेवट नसून नव्या जबाबदारीच्या आणि नव्या संधींच्या प्रवासाची सुरुवात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या आयोजनात महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग,क्रीडा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.विविध विभागांच्या समन्वयातून कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. दीक्षांत समारंभामुळे महाविद्यालय परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.शंतनू चव्हाण यांनी तर प्रास्ताविक डॉ. छत्रगुण भोरे यांनी केले

या प्रसंगी विद्यार्थी, प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयाशी संबंधित मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आपल्या शैक्षणिक यशाचा आनंद आणि भविष्यातील नव्या संधींचा उत्साह स्पष्टपणे दिसून येत होता.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील हा दीक्षांत समारंभ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्तृत्वाचा गौरव करणारा तसेच त्यांच्या उज्ज्वल भवितव्याला प्रेरणा देणारा ठरला.ज्ञान, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचा वारसा घेऊन विद्यार्थी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सपत्नीक सत्कार

## सेवेतील योगदानाबद्दल प्रशासनाकडून गौरव; अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या हस्ते सत्कार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर प्रशासनाच्या वतीने नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सपत्नीक सत्कार सोहळा वेरूळ सभागृहात आयोजित करण्यात आला. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या हस्ते सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.




या सोहळ्यात उपमुख्य कार्यकारी अधिकारी (व्ही. बी.जी.रामजी) अनुपमा नंदनवनकर, कनिष्ठ प्रशासन अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक अजय बोधनकर आणि वरिष्ठ सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग नंदकिशोर काळे या तीन सत्कारमूर्तींचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्यांच्या प्रदीर्घ सेवाकाळातील योगदानाबद्दल प्रशासनाच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला अर्थ व बांधकाम सभापती सचिन गरड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक वासुदेव सोळंके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) राघवेंद्र घोरपडे, जिल्हा परिषद सदस्य रतन बत्तीसे, पांडुरंग औटे यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी सहाय्यक प्रशासन अधिकारी मीना तपकिरे, शेखर करंडे, दिलीप निकम, राजू जोशी, सुनील पाटील, संजय दारुंटे, कुरा सर, राजेंद्र चव्हाण, भाऊसाहेब सोनवणे, निलेश जाधव, दिनकर अहिवाड, शरद पाटील, अरविंद कुकलारे, अजित गायकवाड, सुनील व्यास, योगेश चौकडे, सुनील मोरे, विवेक साळुंके, प्रेमसिंग घुसींगे, नरेश डोनकलवार, संदीप निकम, अमरिश पितांबरे, सतीश माने, श्रीमती नेमाने, मनोज जैस्वाल, अजय सावळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक पशुधन विकास अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर बिडाईत यांनी केले.

# स्कूलबस सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष केल्यास शाळांवर कारवाई; ऑक्टोबरनंतर कठोर पावले उचलण्याचे पोलीस आयुक्तांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : विद्यार्थ्यांच्या शाळेतील प्रवासादरम्यान त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी केवळ वाहन चालकावर ढकलून चालणार नाही, तर मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापनानेही याची नैतिक व प्रशासकीय काळजी घेतली पाहिजे, असे स्पष्ट शब्दांत सांगत पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी जिल्ह्यातील सर्व शाळांना स्कूलबसच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे बजावले आहे. शहरातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या सुरक्षिततेचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय स्कूलबस सुरक्षा समितीची महत्त्वाची बैठक सोमवारी (दि. ३१) सायंकाळी पार पडली. पोलीस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या उच्चस्तरीय बैठकीस परिवहन विभागाचे अधिकारी विनय कोठाळे, वाहतूक शाखेचे उपायुक्त सुभाष भुजंग, माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी संघरत्न सरोदे यांच्यासह शिक्षण आणि परिवहन विभागातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा तिहेरी ताळेबंद तपासण्यात आला असून बसची तांत्रिक तंदुरुस्ती, कागदपत्रे आणि चालकांची पार्श्वभूमी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.



शाळांनी वापरत असलेल्या बस आणि व्हॅनची फिटनेस प्रमाणपत्रे, वैध पासिंग, विमा, प्रदूषण नियंत्रण दाखले, अग्निशामक यंत्रणा, आपत्कालीन दरवाजे आणि प्रथमोपचार पेट्यांची स्थिती नेहमी अद्ययावत असावी, असे स्पष्ट करण्यात आले. तसेच बसमध्ये जीपीएस ट्रॅकर आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक असून चालकाचे चारित्र्य, त्यांचा अनुभव आणि शाळकरी मुलांशी असणारे त्यांचे वर्तन याकडेही शाळा प्रशासनाने जातीने लक्ष दिले पाहिजे, असे आयुक्तांनी सुचवले. अनेकदा क्षमतेपेक्षा जास्त मुलांना कोंबून वाहने चालवली जातात, यावरही पालकांच्या सहभागातून आळा घालण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

गेल्या जुलै महिन्यात शासनाने स्कूलबस सुरक्षेबाबत जे सुधारित नियम जाहीर केले होते, त्यांची अंमलबजावणी आता जिल्ह्यात गतीने सुरू झाली आहे. सर्व शाळांना त्यांच्याकडील वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी ऑक्टोबर २०२६ पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे. या मुदतीत ज्या शाळा नियमांची पूर्तता करणार नाहीत किंवा विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ करत निष्काळजीपणा दाखवतील, त्यांच्यावर थेट कठोर कायदेशीर व प्रशासकीय कारवाईचा बडगा उगारला जाईल, असा इशारा बैठकीत देण्यात आला.

विद्यार्थ्यांचा हा प्रवास पूर्णपणे सुरक्षित व्हावा यासाठी आता शिक्षण, परिवहन आणि पोलीस विभाग एकत्र येऊन संयुक्त मोहिमेच्या माध्यमातून शाळांची आणि बसची अचानक तपासणी करणार आहेत. त्यामुळे शाळा चालकांनी कोणत्याही प्रकारच्या कुचराईविना नियमांची अंमलबजावणी पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# सोयगाव तालुक्यातील घोसला येथील 60 स्वामी समर्थ सेवेकऱ्यांची त्र्यंबकेश्वर येथे 70 किमी ब्रह्मगिरी परिक्रमा पूर्ण; बळीराजाच्या सुखासाठी जप-अनुष्ठान

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव दि.१ (प्रतिनिधी)

पवित्र श्रावण महिन्याचे औचित्य साधून घोसला येथील श्री स्वामी समर्थ सेवेकऱ्यांनी श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे जाऊन ब्रह्मगिरी पर्वताची तब्बल ७० किलोमीटरची पायी प्रदक्षिणा यशस्वीरीत्या पूर्ण केली.या प्रवासादरम्यान राज्यातील बळीराजा व शेतकऱ्यांच्या सुख-समृद्धीसाठी तसेच उत्तम पर्जन्ययोगासाठी (चांगल्या पावसासाठी) गौतम ऋषी पर्वतावर विशेष जप, अनुष्ठान आणि महायज्ञ करण्यात आला.७० किलोमीटरची खडतर पायी प्रदक्षिणा



हिंदू संस्कृतीत श्रावण महिन्यात देवदर्शन व पर्वतांच्या परिक्रमेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. याच भावनेतून घोसला येथून दोन लक्झरी बसद्वारे ६० स्वामी समर्थ सेवेकरी त्र्यंबकेश्वरसाठी रवाना झाले होते. सेवेकऱ्यांनी ब्रह्मगिरी पर्वतावरील मुख्य ब्रह्मगिरी मंदिर, गंगा-गोदावरी नदीचे उगमस्थान आणि भगवान भोलेनाथ यांनी जिथे जटा आपटून गंगेला प्रगट केले त्या अतिपवित्र स्थानाचे भावपूर्ण दर्शन घेतले. त्यानंतर सर्वांनी अत्यंत श्रद्धेने आणि शिस्तीत ७० किलोमीटरची पायी ब्रह्मगिरी प्रदक्षिणा पूर्ण केली.

बळीराजाच्या समृद्धीसाठी जप-अनुष्ठान

परिक्रमा पूर्ण केल्यानंतर गौतम ऋषी पर्वतावर सर्व ६० सेवेकऱ्यांनी एकत्रित येऊन जप,अनुष्ठान व यज्ञ पूर्ण केला. यंदा सर्वत्र चांगला पाऊस पडून शेतकरी वर्ग सुखी-समृद्ध व्हावा,या निसर्गकल्याणाच्या मुख्य उद्देशाने हा धार्मिक उपक्रम राबवण्यात आला.

हा संपूर्ण धार्मिक सोहळा संदीप माऊली यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या उपक्रमात घोसला येथील सेवेकरी बाबुराव वाघ,संभाजी पाटील, प्रदीप पाटील, राजू तडवी, अरुण तडवी, रामभाऊ माळी, मधुकर गायकवाड, सर्जेराव पवार, निलेश गोपाळ, रितेश गवळी, जीवन गवळी यांच्यासह ६० सेवेकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. सर्व सेवेकऱ्यांच्या या भक्तिमय व सामाजिक उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

# विश्वकर्मा जयंतीनिमित्त नवीन कार्यकारिणी जाहीर

## प्रकाश जांगिड महाराज अध्यक्षपदी; पांडुरंग शिरसाठ उपाध्यक्ष, संजय विश्वकर्मा सचिव

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : नवीन छत्रपती संभाजीनगर जिल्हा सार्वजनिक श्री विश्वकर्मा चॅरिटेबल ट्रस्टच्या नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी ज्योतिषाचार्य पं. प्रकाशजी जांगिड महाराज, उपाध्यक्षपदी पांडुरंग शिरसाठ, तर सचिवपदी संजय विश्वकर्मा यांची एकमताने निवड करण्यात आली.

सिडको एन-६ परिसरातील श्री विश्वकर्मा भवन येथे दि. १७ सप्टेंबर रोजी श्री विश्वकर्मा पूजन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी आयोजित बैठकीत नवीन कार्यकारिणी निश्चित करण्यात आली. बैठकीस संस्थापक अध्यक्ष अशोक बी. पगार, कार्याध्यक्ष उद्धवराव थोरात, जिल्हाध्यक्ष राजू सालपे तसेच प्रदेश सचिव बबनराव पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

दि. १७ सप्टेंबर रोजी भगवान श्री विश्वकर्मा यांची जयंती व पूजन देशभर उत्साहात साजरे केले जाते. विश्वकर्मा समाजातील सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांना अधिक गती देण्याच्या उद्देशाने नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

**नवीन कार्यकारिणी अशी** : संस्थापक अध्यक्ष अशोक बी. पगार, अध्यक्ष ज्योतिषाचार्य पं. प्रकाशजी जांगिड महाराज, उपाध्यक्ष पांडुरंग शिरसाठ, सचिव संजय विश्वकर्मा, सदस्य रामेश्वर वाघ, मोहन सोनवणे, राम काळे, रमेश पांचाळ, प्रकाश चाफेकर आणि सिताराम राजगुरू.

यावेळी सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या माध्यमातून विश्वकर्मा समाजासाठी विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि विधायक उपक्रम राबविण्याचा संकल्प संस्थापक अध्यक्ष अशोक बी. पगार यांनी व्यक्त केला.

दरम्यान, १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या श्री विश्वकर्मा पूजन दिनाच्या कार्यक्रमात समाजातील प्रत्येक सदस्याने मोठ्या संख्येने सहभागी होऊन भगवान श्री विश्वकर्मा महाराजांचे आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन नवनिर्वाचित अध्यक्ष ज्योतिषाचार्य पं. प्रकाशजी जांगिड महाराज यांनी केले.

# कारागृहातील कैद्यांना नशामुक्ती व तणावमुक्त जीवनासाठी मार्गदर्शन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी,** : सुधारणा व पुनर्वसन उपक्रमांतर्गत महाराष्ट्र कारागृह विभागाच्या 'ब्रीद वाक्य सुधारणा व पुनर्वसन' या संकल्पनेनुसार परभणी जिल्हा कारागृह येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा कारागृह, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने नशामुक्ती व स्वसंयमनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश श्री. आर. एम. सादरंगी तसेच सचिव भूषण काळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, परभणी येथील ब्रह्मकुमारी बी. के. शारदा यांनी कैद्यांना नशामुक्ती व ताण-तणावातून मुक्त होण्यासाठी मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात श्री. काळे यांनी कारागृहातील कैद्यांनी नशामुक्त व तणावमुक्त जीवन जगण्यासाठी मनावर नियंत्रण ठेवण्याचे आवाहन केले. तसेच जीवनामध्ये घडलेल्या घटनांचा वारंवार विचार न करता त्याकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून स्वतःमध्ये बदल घडवून आणता येतो, याबाबत उदाहरणांसह मार्गदर्शन केले.

ब्रह्मकुमारी बी. के. शारदा यांनीही त्यांना मनशांती, आत्मसंयमन आणि व्यसनमुक्त जीवन याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भूषण काळे, जिल्हा कारागृह अधीक्षक पांडुरंग भुसारे, तुरुंगाधिकारी वर्ग-१ राजेंद्र मरळे, तुरुंगाधिकारी वर्ग-२ श्रीमती स्वाती जाधवर, ब्रह्मकुमारी बी. के. शारदा, अविनाश सनसईक तसेच कारागृहातील इतर कर्मचारी उपस्थित होते.

# अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्पाच्या मुख्य कालव्याच्या विशेष दुरुस्तीसाठी 3 कोटी 54 लाखांची प्रशासकीय मान्यता

## आमदार अब्दुल सत्तार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१ सप्टेंबर

अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्पाच्या मुख्य कालव्याच्या दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्पातून वाहून जाणारे पाणी उजव्या कालव्यातून ठाणा पिकअप वेअरमध्ये सोडण्याच्या दृष्टीने मुख्य कालव्याच्या विशेष दुरुस्तीच्या कामास ३ कोटी ५४ लाख ६१ हजार ६५० रुपयांची प्रशासकीय मान्यता शासनाने दिली आहे. या निर्णयामुळे कालव्याची वहन क्षमता वाढण्यासह सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित होण्यास मोठी मदत होणार आहे.

अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्प हा वाघूर नदीवर अजिंठा गावाच्या दक्षिणेस बुलढाणा रोडवर सुमारे ३ किलोमीटर अंतरावर असून सन १९८४ मध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. प्रकल्पाची पूर्ण जलाशय पातळी ८.४३ दलघमी असून पूर्ण जलाशय पातळीचा निव्वळ साठा १.६५ दलघमी, तर मृत साठा ०.८८ दलघमी इतका आहे. प्रकल्पाच्या सांडव्याची लांबी ३०० मीटर असून सांडव्याचा संबंधित विसर्ग ७८१.१७ घमी/सेकंद इतका आहे. प्रकल्पांतर्गत ५.२ किलोमीटर लांबीचा उजवा कालवा असून त्याची विसर्ग क्षमता १.७२ घमी/सेकंद इतकी आहे. कालव्याची सर्व बांधकामे सन १९८४ पूर्वीच पूर्ण करण्यात आली आहेत.



मात्र, मुख्य कालव्याची अनेक वर्षांपासून दुरुस्ती झालेली नसल्याने कालव्याची वहन क्षमता कमी झाली होती. त्यामुळे कालव्याचे अस्तरीकरण करणे, भराव दुरुस्ती करणे, कालव्यावरील विमोचक दुरुस्ती करणे, तसेच कालव्यावरील नाला क्रॉसिंग व रोड क्रॉसिंगची दुरुस्ती करणे आदी कामे प्रस्तावित करण्यात आली होती.

सदर कामे पूर्ण झाल्यानंतर कालव्याची वहन क्षमता वाढून पाण्याची गळती व अपव्यय कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच अवर्षणग्रस्त, दुष्काळी भाग व डोंगराळ भागातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्यास मदत होईल. याशिवाय आजूबाजूच्या गावांना पिण्याच्या पाण्यासाठीही या पाण्याचा उपयोग होणार असून, अंदाजे १६३ हेक्टर सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित होण्यास मदत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्पातून वाहून जाणारे पाणी प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून ठाणा पिकअप वेअरमध्ये सोडण्याच्या दृष्टीने मुख्य कालव्याच्या दुरुस्ती कामाचा विशेष दुरुस्ती प्रस्ताव शासनाकडे सादरकरण्यात आलेला होता त्याअनुषंगाने शासनाने या प्रस्तावास मान्यता देत रु. ३,५४,६१,६५०/- इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

आमदार अब्दुल सत्तार यांनी या महत्त्वपूर्ण कामासाठी सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा केल्याने अखेर हा निर्णय घेण्यात आला असून, या कामामुळे परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी अधिक प्रभावीपणे पाणी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये 'डीजे'मुक्त आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी प्रशासनाची तयारी; उत्कृष्ट मंडळांना रोख पुरस्कार जाहीर

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

यंदाचा गणेशोत्सव पूर्णपणे 'डीजे'मुक्त, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली असून, यादरशी प्रशासकीय यंत्रणा, पोलीस दल, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक गणेश मंडळे आणि नागरिक यांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या सर्व शासकीय विभागांच्या समन्वय बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., जिल्हा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, नगरपालिका मुख्याधिकारी आणि संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते, तर क्षेत्रीय अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे जोडले गेले होते. उत्सव काळात होणारे ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी आणि गणेशोत्सवाचे पावित्र्य टिकवून ठेवण्यासाठी सार्वजनिक गणेश मंडळांनी डीजेचा वापर टाळावा आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात उत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. प्रशासनाकडून मंडळांशी



सातत्याने संवाद साधून त्यांना नियमांचे पालन करण्याबाबत योग्य त्या सूचना व मार्गदर्शन केले जात आहे. सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये सामाजिक उपक्रम राबविणे, पर्यावरणपूरक सादरीकरण करणे, स्वच्छता राखणे आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार तालुका व जिल्हास्तरावर उत्कृष्ट मंडळांना गौरविण्यात येणार आहे. तालुका पातळीवर प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या गणेश मंडळास २५ हजार रुपयांचे बक्षीस दिले जाईल. तसेच जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकासाठी ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ४० हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ३० हजार रुपयांचे भरभक्कम रोख पारितोषिक दिले जाणार आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त गणेश मंडळांनी सहभाग घ्यावा, यासाठी व्यापक प्रचार करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

मंडप उभारणीपासून ते मूर्ती विसर्जनापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मंडपाच्या ठिकाणी अग्निप्रतिबंधक उपाययोजना, सुरक्षित विद्युत पुरवठा, आपत्कालीन व्यवस्थापन, तसेच उत्तम स्वच्छता आणि आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गर्दीच्या संभाव्य ठिकाणांवर वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून वाहतूक नियमन आणि वाहन पार्किंगचे नियोजन आधीच करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आगमन आणि विसर्जन मिरवणुकीच्या मार्गांवर पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात केला जाणार असून मिरवणूक मार्ग, पार्किंगची ठिकाणे आणि पर्यायी मार्गांची निश्चिती करण्यात आली आहे. विसर्जन स्थळांवर पुरेशी प्रकाश व्यवस्था, वैद्यकीय पथके आणि रुग्णवाहिका सज्ज ठेवण्याचे सांगण्यात आले असून विसर्जन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तातडीने स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जलप्रदूषण रोखण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती आणि नैसर्गिक साहित्याच्या वापरास विशेष प्रोत्साहन दिले जात आहे.

उत्सव काळात मंडळांतर्फे वाटप केला जाणारा प्रसाद आणि बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या मिठाईची विशेष तपासणी करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनाला देण्यात आले आहेत. प्रसाद वाटपासाठी मंडळांनी परवाना घेणे आवश्यक असून, यासाठी प्रशासनाकडून मंडळांना सहकार्य केले जाईल. खाद्यपदार्थांची गुणवत्ता काटेकोरपणे तपासून कोणत्याही प्रकारच्या भेसळयुक्त पदार्थांची विक्री किंवा प्रसाद म्हणून वाटप होणार नाही, याची दक्षता घेण्याची तकीद देण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेश मंडळांची संपर्क यादी अद्ययावत ठेवण्यास सांगण्यात आले आहे.

विसर्जनाच्या दृष्टीने संवेदनशील आणि महत्त्वाच्या ठिकाणांच्या व्यवस्थेवर बोलताना जिल्हा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी गंगापूर तालुक्यातील कायगाव टोका परिसरातील विसर्जन स्थळावर भाविकांची होणारी मोठी गर्दी लक्षात घेऊन तेथे चोख सुरक्षा आणि पुरेशी प्रकाश व्यवस्था करण्याचे निर्देश दिले. स्थानिक यंत्रणांनी या भागावर विशेष लक्ष देऊन विसर्जन प्रक्रिया सुरक्षित आणि सुरळीत पार पाडावी, असे त्यांनी नमूद केले. तसेच या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी समाजकंटकांवरील प्रतिबंधात्मक कारवाईची सर्व प्रकरणे तातडीने निकाली काढावीत, असे आदेश त्यांनी पोलीस यंत्रणेला दिले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस्, सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911